## सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, लातूर

दुरध्वनी क्र.–(०२३८२)२५८९६९ e-mail:- dyceogenlatur@gmail.com


# अनुकंपा नियुक्ती आदेश

वाचा :-1.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक अकंपा-1093/2335/प्र.क्र.90/93/आठ, दिनांक 26 आक्टोंबर 1994

2.शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक-अराप-1098/प्र.क्र.2052/15 दिनांक 12 मार्च,1999.

3.ग्राम विकास विभागाचे पत्र.क्रमांक-1000/प्र.क्र./2820/15 दिनांक 21 जुलै, 2000.

4.शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक अकंपा.1000/प्र.क्र.20/2000/आठ दिनांक 28 मार्च,2001.

5.शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक.प्र.क्र.59/2000/आठ,दिनांक 24.9.2001

6.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक अकंपा-1004/प्र.क्र.51/2004/आठ दिनांक 22.8.2005

7.शासन परिपत्रक.क्रमांक.अकंपा-1009/826/प्र.क्र.201/09/आठ दिनांक 5.2.2010

8.शासन परिपत्रक.क्र.सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा/1010/प्र.क्र..244/आठ दि.13.10.2010

9.शासन निर्णय.क्रमांक.अकंपा-2014/प्र.क्र.26/आस्था-9 दिनांक 20 ऑगष्ट,2015

10 .शासन निर्णय.क्रमांक:अकंपा 1217/प्र.क्र.102/आठ दिनांक 21 सप्टेंबर, 2017

11.शासन निर्णय.क्रमांक:अकंपा-1219/प्र.क्र.56/आठ दिनांक 11 सप्टेंबर, 2019

12.उप सचिव, महाराष्ट्र शासन ग्रा.वि.वि.यांचे प.क्र.2021/प्र.क्र.9/आ-7/दि.8 मार्च 2021.

जा.क्र.जिपला/साप्रवि/अंकपा/सीआर- /कार्या-7/कावि-
सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद,लातूर.
दिनांक :- 17.7.2021

आदेश :-

आपणास कळविण्यात येते की, जिल्हा परिषद,लातूर अंतर्गत खालील दर्शविलेल्या पंचायत समिती अंतर्गत आपली अनुकंपा तत्वावर कंत्राटी पध्दतीने ग्रामसेवक म्हणून नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यांत येत आहे.

| अक्र | मयत कर्मचा-याचे नाव व मृत्यूवेळी कार्यरत पदनाम | नियुक्ती द्यावयाचे वारस अर्जदाराचे नाव व रकाना 2 मधील कर्मचा-याशी नांते | नियुक्तीचे पद | मानधन | मुळ जात प्रवर्ग | उमेदवाराचा निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे नियुक्तीचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बिरादार बालाजी शंकरराव मुख्याध्यापक | बिरादार पवन बालाजीराव, रा.जय नगर संतोषी मातानगर सिग्नल नप.2. भगिरथ शाळेच्या पाठीमागे उदगीर | कंत्राटी ग्रामसेवक | 6000/- | खुला | खुला | पं.स.देवणी |
| 2 | कुरे देविदास व्यंकटराव, शारिरिक शिक्षक | कुरे शुभम देविदास रा.पानंगाव ता.रेणापूर | कंत्राटी ग्रामसेवक | 6000/- | अनु. जाती | अनु.जाती | पंचायत समिती रेणापूर |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | उगीले ज्ञानोबा धोंडीबा सह शिक्षक | उगीले सिध्दांत ज्ञानोबा मु.पो.नळगीर ता.उदगीर | कंत्राटी ग्रामसेवक | 6000/- | इतर मागास | इतर मागास | पंचायत समिती जळकोट |
| 4 | काचगूंडे हनुमंत मोतीराम परिचर | काचगूंडे सचिन हनुमंत रा.वाडी वाघोली ता.लातूर | कंत्राटी ग्रामसेवक | 6000/- | भज-क | भज-क | पंचायत समिती निलंगा |

## नियम व अटी

1.कंत्राटी ग्रामसेवक म्हणुन आपली नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधिन असेल त्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत विहीत नमुन्यातील हमीपत्र लिहून द्यावे लागेल.

2.आपली कंत्राटी ग्रामसेवक म्हणून नियुक्ती आपण प्रत्यक्षात पंचायत समितीस रुजू झाल्यापासून 03 वर्षाच्या कालावधीकरिता राहील.

3.नियुक्तीपुर्वी आपणास सुरक्षा ठेव म्हणून रु 10,000/- एवढी रक्कम गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडे भरावी लागेल व दोन प्रतिष्ठीत व्यक्तीने जामीन पत्र लिहून द्यावे लागेल.

4.हा कालावधी संपल्यानंतर कंत्राटी ग्रामसेवक म्हणून आपली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.त्यासाठी आपणास कोणत्याही स्वरुपाची वेगळी सुचना दिली जाणार नाही.

5.नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही प्रकारचे गैरवर्तणुक केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.त्यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.तथापी आपली नियुक्ती रद्द करणा-या विरुध्द आपणास विभागीय आयुक्त यांचेकडे अपील करता येईल.नियमीत स्वरुपात केलेल्या ग्रामसेवकाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या कर्मचा-याच्या सेवा सुविधा आपणास अनुज्ञेय असणार नाहीत.

6.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं.पअक/1005/प्रक्र36/05/16-अ/दिनांक 26 ऑगष्ट 2005 नुसार लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

7.कंत्राटी ग्रामसेवक या पदावर 3 वर्षे समाधानकारक सेवा केल्यानंतर आपणास ग्रामसेवक नियमीत पदावर वेतन श्रेणीत नियुक्ती देण्याबाबत विचार करण्यात येईल.आपण ग्रामसेवक म्हणून कंत्राटी पध्दतीवर सेवा वेतन निश्चीती,सेवानिवृत्तीवेतन किंवा अन्य कोणत्याही बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

8.आपणास कंत्राटी ग्रामसेवक म्हणून हमीपत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास आपण आपल्या गट विकास अधिकारी यांचे मार्फत एक महिन्याची पुर्व सुचना आपल्या नियुक्ती प्राधिका-यास देणे किंवा एक महिन्याच्या मानधनची रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे जमा करणे बंधनकारक राहील आपण विहीत मुदतीत तशी पुर्व सुचना न दिल्यास अथवा मानधनाची रक्कम जमा न केल्यास आपणास पुन्हा भविष्यात ग्रामसेवक म्हणून नियुक्ती देता येणार नाही.

9.ग्रामसेवक म्हणून आपणास दरमहा रु **6000/-(सहा हजार मात्र)** एकत्रीत वेतन व नियमानुसार कायम प्रवास भत्ता रुपये 1500/- देण्यात येईल.त्याखेरीज इतर कोणतेही लाभ आपणास अनुज्ञेय असणार नाही.

10.उमेदवाराने नियुक्ती करीता सादर केलेले दस्ताऐवज खोटी आढळल्यास अथवा नियुक्तीसाठी अपात्रता करणारी माहीती दडविल्याचे निष्पन्न झाल्यास सेवेतून तात्काळ कमी करण्यात येईल.

11.पोलीस विभागाचे रेकॉर्डप्रमाणे संबंधीताचे चारित्र्य,सचोटी कर्तव्य तत्परात अयोग्य आढळल्यास उमेदवारास सेवेतून कमी करण्यात येईल.

12.जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील परिशिष्ट (6) नुसार वय व शेक्षणीक अर्हता बाबत खात्री झाल्याचे नियुक्ती प्राधिका-याचे प्रमाणपत्र उमेदवारांच्या प्रथम पगार पत्रकास जोडणे आवश्यक राहील.

13.जिल्हा शल्य चिकीत्सक लातूर यांचे शारीरीक पात्रतेचे वैद्दकीय प्रमाणपत्र प्रथम पगारास जोडावे लागेल.

14.नियुक्ती केलेल्या उमेदवारांनी पदस्थापनेमध्ये बदल करण्याबाबत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबात तंत्राचा वापर केल्यास ते गैरवर्तणूक ठरले व नियमानुसार कार्यवाहीस पात्र राहील.

15.अ.क्र. 2,3,4 वरील मागास प्रवर्गातील उमेदवारांने त्यांची जात प्रमाणपत्राची वैधता जात पडतळणी समितीकडून शासन निर्णय दिनांक 12 डिसेंबर 2011 अन्वये 6 महिण्याच्या आत जातप्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहिल.जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल व अशा उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती जमाती,विमुक्त जाती व भटक्या जमाती इतर

मागासवर्ग व विशेष मागासप्रवग (जातीचे)प्रमाणपत्र देण्याचे वत्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

16.महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियुक्तीच्या वेळी देणे बंधनकारक राहिल.दिलेली माहीती खोटी निघाल्यास अथवा मुलांची संख्या 02 पेक्षा अधिक असल्यास आपणास नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येईल.

17.कंत्राटी ग्रामसेवकांना पायाभुत प्रशिक्षण दिल्यानंतरच ग्रामपंचायत देण्यात यावी.

18.उमेदवारास नियुक्ती ठिकाणी पंधरा दिवसाच्या आत स्वखर्चाने उपस्थित व्हावे लागेल अन्यथा दिलेली नियुक्ती रद्द समजण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
(अभिनव गोयल भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,लातूर

<u>प्रतिलिपी माहीतीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-</u>

1.मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर

2.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य/ग्राम पंचायत) जिल्हा परिषद,लातूर

3.गट विकास अधिकारी पं.स.देवणी,रेणापूर,जळकोट,निंलंगा यांना देवून सुचित करण्यात येते की,संबंधिताकडून आवश्यक ती रक्कम व जमानतनामा,हमीपत्र घेवून रुजू करुन घेण्यात यावे.संबंधिताचा रुजू अहवाल या कार्यालयास सादर करावा.

4.संबंधितास.

Abhinav
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,लातूर